# यावल महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्यू संपन्न

यावल (प्रतिनिधी)- येथील ज. जि. म. वि. प्र. सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आय.क्यू. ए.सी., प्लेसमेंट सेल, व क्रेडिट एक्सेस ग्रामीण लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी एरिया मॅनेजर श्री संजय द्वासे, शाखा व्यवस्थापक श्री योगेश पळसपगार, श्री इमरान शहा, उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, प्रा. एम. डी. खैरनार आदी उपस्थित होते.

प्रारंभी सरस्वती प्रतिमा पूजन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे, विद्यार्थ्यांनी संधीचे सोने करावे असे मार्गदर्शन केले. यावेळी एरिया मॅनेजर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यात 62 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यात 14 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग दिली जाणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय पाटील यांनी केले तर आभार प्रा. मनोज पाटील यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डॉ.एस. पी. कापडे, डॉ. सुधा खराटे,डॉ एच. जी. भंगाळे, डॉ. आर. डी. पवार, डॉ. पी. व्ही. पावरा, अरुण सोनवणे, इ.आर. सावकार, नरेंद्र पाटील, गणेश जाधव,सि. टी. वसावे, सुभाष कामळी, मिलिंद

बोरघडे, संतोष ठाकूर, प्रमोद कदम, अनिल पाटील, प्रमोद जोह्रे,अमृत पाटील यांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

# यावल महाविद्यालयात युथ इनोव्हेशन ॲण्ड स्टार्टअप्स वर मार्गदर्शन

यावल : येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जळगाव येथील भरारी फाउंडेशन, आय.क्यू. ए.सी. विभाग व करियर गायडन्स यांच्या संयुक्त विद्यमाने युथ इनोव्हेशन्स अँड स्टार्टअप्स या विषयावर डॉ. युवराज परदेशी यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे होत्या. कार्यक्रमात दीपक परदेशी (स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग), तुषार भामरे व मोहित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी ग्रामीण भागातील युवकांमध्ये सुप्त गुणांना चालना देण्यासाठी भारत सरकारने स्टार्ट अप्स च्या माध्यमातून युवकांना रोजगार संधी उपलब्ध करून दिली असून संधीचे सोने करावे, असे प्रतिपादन केले. डॉ. परदेशी यांनी स्टार्ट ॲप्स मुळे आजचा युवक स्वतःच्या पायावर उभा राहून रोजगार संधी उपलब्ध करू शकतो त्यामुळे स्वयंरोजगार व उद्योगजता वाढू शकते असे मार्गदर्शन केले. दीपक परदेशी यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील समस्या दूर करण्यासाठी आम्ही आमच्या परीने सर्वतोपरी मदत करू असे सांगितले. कार्यक्रमात बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संजय पाटील यांनी केले तर आभार प्रा. एम.डी. खैरनार यांनी मानले.

Jalgaon Edition
Sep 24, 2022 Page No. 06
Powered by : eReleGo.com